खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय राजगुरूनगर

ता. खेड, जि.पुणे

## भूगोल विभाग

## अभ्यास सहल

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या भूगोल विभागातर्फे दरवशी अनेक उपक्रमांचे आयोजन केले जाते. गुरूवार दि. 20/02/2025 रोजी भूगोल विभाग आणि मराठी विभाग यांनी संयुक्तपणे सहलीचे आयोजन केले. सहल एस.टी.ने जाणार होती. भूगोल विभागातील 37 विद्यार्थी या सहलीत सहभागी झाले होते.

गुरूवारी पहाटे 5.00 वाजता विद्यार्थी एस.टीन सहलीसाठी निघाले. या सहलीमध्ये भूगोल, मराठी, दिल इंग्लिश, प्राणीशास्त्र या विभागातील विद्यार्थी होते. एकूण तीन एस.टी.बसेसमध्ये हे आशीष विद्यार्थी बसले.

सकाळी आठ वाजता सहलीतील विद्यार्थी वाई येथे आले. तेथील महागणपतीचे दर्शन घेतल्यानंतर प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांनी वाई येथे नाष्टा घेतला. तेथील जुनी मंदिरे आणि कृष्णा नदीचे महत्व डॉ. दादासाहेब मारकड यांनी विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. यानंतर पसरणी घाट चढून विद्यार्थ्यांची सहल पाचगणी मार्गे पुस्तकांचे गाव असणाऱ्या भिलार येथे आली. भिलार येथे विद्यार्थ्यांना पुस्तकांचे वेगवेगळे प्रकार सांगण्यात आले. तसेच कोणत्या प्रकारची पुस्तके कोठे आहेत, कोणाच्या घरी आहेत, ती कशी वाचायची वगैरे सर्व माहिती स्थानिकांकडून देण्यात आली.

यानंतर विद्यार्थ्यांना मधाचे गाव असणाऱ्या मांघर येथे नेण्यात आले. मांधर हे मधुमक्षिका पालन यासाठी प्रसिद्ध आहे. मांघर येथे विद्यार्थी गेल्यानंतर तेथील स्थानिकांनी विद्यार्थ्यांना आणि प्राध्यापकांना मधुमक्षिका पालन कसे करावे याविषयी मार्गदर्शन केले. मधमाशांचे अनेक प्रकार सांगितले. मधुमक्षिका पालन हे बंद पेट्यांमध्ये केले जाते. त्याविषयी विद्याथ्र्यांना माहिती दिली.

पुढे विद्यार्थ्यांना प्रतापगड येथे नेण्यात आले. प्रतापगड हा छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमासाठी प्रसिद्ध आहे. येथे शिवरायांनी अफझलखानाला ठार केले. गडाच्या चढणीवर सुरूवातीलाच जी माची लागते त्या माचीवर शिवराय आणि अफजलखान यांची झटापट झाली. या शिवरायांनी अफजलखाला ठार केले. शिवरायांच्या दहा अंगरक्षकांनी अफजलखानाच्या दहा अंगरक्षकांनाही ठार केले. तेथेच शिवरायांनी अफजलखानाची समाधी बांधली. सध्या त्या समाधीच्या परिसराचे जीर्णोद्धाराचे काम चालू आहे. पुढे सर्व

विद्यार्थी प्रताप गडावर गेले. तेथील माची, बुरूज, तटबंदी, विविध मंदिरे, पंडित नेहरूद्वारे अनावर झालेला छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा हे सर्व पाहिले. यानंतर विद्यार्थ्यांनी गडावरच वेगवेगळ्या हॉटेल्समध्ये दुपारचे जेवण घेतले. दुपारी जेवणानंतर विद्यार्थ्यांना कोयना नदीच्या खोऱ्यात आणले. तेथे कोयना नदीवर छत्रपती शिवाजी महाराजांनी बांधलेला पूल पाहिला. पुढे आंबेनळी घाट चढून विद्यार्थ्यांना महाबळेश्वर येथे आणले गेले.

महाबळेश्वर येथे अनेक पॉईंटस आहेत. पंचगंगा मंदिर, जुने महाबळेश्वर येथील महाबळेश्वर मंदिर, ऑर्थरसीट पॉइंट, बॉम्बे पॉईंट, सनसेट पॉइंट, मंकी पॉईंट, लॉडविक पॉईंट, वेण्णा लेक यापैकी काही पॉईंट्सना विद्यार्थ्यांनी भेट दिली. तेथे प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांना विविध स्थळांची माहिती दिली. यानंतर सायंकाळी मॅप्रो गार्डन येथे विद्यार्थ्यांना आणले गेले. तेथे विद्यार्थी आणि प्राध्यापकांनी काही वस्तूंची आणि स्ट्रॉबेरीची खरेदी केली. अशारीतीने यशस्वीरीतीने सहल पूर्ण झाली. सहलीमध्ये विद्यार्थ्यांसोबत डॉ. संजय शिंदे, प्रा. के.जे.लांडेपाटील, डॉ. डी.एम.मारकड, डॉ.बी.डी.अनुसे, प्रा. एम.एल.मुळूक, डॉ. श्वेतांबरी मांडे, डॉ. सागर थेऊरकर, प्रा. वृषाली काठे, प्रा. रौनक भिसे हे प्राध्यापक होते.




पुस्तकांचे गाव भिलार येथे विद्यार्थ्यांना माहिती देताना स्थानिक




मांघर येथे मधुमक्षिका पालनाबाबत माहिती घेताना सहलीतील विद्यार्थीए सोबत डॉ. डी.एम.मारकड, डॉ. सागर थेऊरकर आणि अन्य.




मधाचे गाव मांघर येथे विद्यार्थी.



वाई येथील कृष्णा नदीच्या काठी घाटावर भूगोल विभागातील विद्यार्थी



वाई येथील महा गणपती मंदिराच्या समोर सहलीतील सर्वशाखीय विद्यार्थी समवेत प्राध्यापक वर्ग




महाबळेश्वर येथील सनसेट पॉईंटवर भूगोल विभागातील विद्यार्थी



महाबळेश्वर येथील उष्ण कटिबंधीय सदाहरित वने (मागच्या बाजूस)




प्रतापगड – एक दृष्य

विभाग प्रमुख
भूगोल विभाग
हुतात्मा राजगुरु महाविद्यालय
राजगुरुनगर, (खेड) जि. पुणे.

डॉ. शिरीष पिंगळे
प्राचार्य
हुतात्मा राजगुरु महाविद्यालय
राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे.